**नियमित फौजदारी केस नं. ५६/२०१५**

**नि. क्र. १३१**

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ चा जबाब शपथेवर सुरु.**

**माझे नाव –** संतोष पांडूरंग पवार,

**वय –** ५९ वर्ष, **धंदा–** रीक्षा चालक,

**राहणार –** ओझरखोल, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास विशेष सहा. सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून सुरु –**

**०१.** दिनांक ०९/०३/२०१४ रोजी पोलीसांनी मला पोलीस ठाणे संगमेश्वर येथे बोलावले होते. मला पंचनाम्यावर सही करण्यासाठी बोलावले होते. तो पंचनामा कशाचा होता ते मी वाचले नाही. मी दोन सहया केल्या. मला आता दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर मला सांगता येत नाही (साक्षीदाराने नमूद केलेल्या स्वाक्षरीला **निशाणी १३२** देण्यात येते).

**०२.** मला आता दाखविण्यात आलेल्या दुसऱ्या एका पंचनाम्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर मला सांगता येत नाही (साक्षीदाराने नमूद केलेल्या स्वाक्षरीला **निशाणी १३३** देण्यात येते).

**०३.** मला आता दाखविण्यात आलेल्या तिसऱ्या एका पंचनाम्यावर माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर मला सांगता येत नाही (साक्षीदाराने नमूद केलेल्या स्वाक्षरीला **निशाणी १३४** देण्यात येते).

**०४.** मला आता दाखविण्यात आलेल्या निशाणी १०० कडील पंचनाम्यावर अनुक्रमांक ०१ चा पंच म्हणून माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर मला सांगता येत नाही.

**(साक्षीदार घडले हकीकतीप्रमाणे जबाब करत नाही त्यामुळे त्यास उलटतपासात विचारावयाचे प्रश्न विचारणेची परवानगी विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी मागितली. साक्षीदाराचा वरील जबाब पाहाता, भारतीय साक्षी पुरावा चे कलम १५४ अन्वये परवानगी मंजूर.)**

**०५**. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ०९/०३/२०१४ रोजी पोलीसांनी मला ग्रामीण रुग्णालय, संगमेश्वर येथे बोलावले होते, साक्षीदार सांगतो की, मी तेथे गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी ग्रामीण रुग्णालय, संगमेश्वर येथे पंचनामा करण्यासाठी उपस्थीत होतो. हे म्हणणे खरे नाही की, त्याठिकाणी मयत संदेश चंद्रकांत मुरकर यांचे कपडे पोलीसांनी जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत माझ्यासमक्ष पंचनामा करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा वाचूनच मी त्यावर निशाणी १३२ कडील सही केली.

**०६**. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९/०३/२०१४ रोजी फिर्यादी प्रविण चव्हाण याने माझ्यासमक्ष पोलीस ठाणे, संगमेश्वर येथे त्याने वापरलेली एक बंदूक, काळया रंगाची चार्जींगची बॅटरी, एक लाल रंगाचे रिकामे बार झालेले काडतूस हजर केले. हे म्हणणे खरे नाही की, हे सर्व साहित्य पोलीसांनी माझ्यासमक्ष जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत माझ्यासमक्ष निशाणी १०० कडील पंचनामा करण्यात आला.

**०७**. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९/०३/२०१४ रोजी फिर्यादी प्रविण विनायक चव्हाण याला अटक करुन पोलीसांनी माझ्यासमक्ष त्याची अंगझडती घेतली. हे म्हणणे खरे नाही की, त्या अंगझडतीत पांढऱ्या रंगाचा एक सॅमसंगचा मोबाईल व सीमकार्ड मिळून आले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी ते माझ्यासमक्ष जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत माझ्यासमक्ष पंचनामा करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा वाचूनच मी त्यावर निशाणी १३३ कडील स्वाक्षरी केली.

**०८**. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९/०३/२०१४ रोजीच दुसरा आरोपी प्रणय प्रकाश सुर्वे याला अटक करुन पोलीसांनी माझ्यासमक्ष त्याची अंगझडती घेतली. हे म्हणणे खरे नाही की, त्या अंगझडतीत एक सॅमसंगचा कंपनीचा मोबाईल व दोन सीमकार्ड मिळून आले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी ते माझ्यासमक्ष जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत माझ्यासमक्ष पंचनामा करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा वाचूनच मी त्यावर निशाणी १३४ कडील स्वाक्षरी केली.

**०९**. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०९/०३/२०१४ रोजीच तिसरा आरोपी राजेश सदानंद मयेकर याला अटक करुन पोलीसांनी माझ्यासमक्ष त्याची अंगझडती

घेतली. हे म्हणणे खरे नाही की, त्या अंगझडतीत एक ॲपल कंपनीचा मोबाईल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी तो मोबाईल माझ्यासमक्ष जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की, त्याबाबत माझ्यासमक्ष पंचनामा करण्यात आला. मला आता दाखविण्यात आलेल्या पंचनाम्यावर अनुक्रमांक ०२ चा पंच म्हणून माझी स्वाक्षरी आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, तो पंचनामा वाचूनच मी त्यावर सही केली होती (साक्षीदाराने नमूद केलेल्या स्वाक्षरीस **निशाणी १३५** देण्यात आली).

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपी क्र. ०१, ०२ व ०४ तर्फे विद्वान विधीज्ञ श्री. ए. एल. चवंडे व आरोपी क्र. ०३ तर्फे विधीज्ञ श्री. सी. एम. मांगले यांनी उलटतपास नाकारला.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

TARE BALIRAM DATTATRAYA

Digitally signed by TARE BALIRAM DATTATRAYA
Date: 2024.10.09 16:36:55 +0530

**(ब. द. तारे)**

दिनांक –०९.१०.२०२४

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

# CERTIFICATE

Evidence in RCC no. 56-2015

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Deorukh. |
| Date | : | 09/10/2024 |
| Evidence signed by the presiding officer on | : | 09/10/2024 |
| Evidence uploaded on | : | 09/10/2024 |